THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 13TH SEPTEMBER 1894.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २ माहे फेब्रुवारी सन १८९४ रोजीं मंजूर केला, तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असेः—

## सन १८९४ चा आक्ट १ ला.

### सन १८९४ चा जमीन घेण्याविषयीं आक्ट.

अनुक्रमणिका.


भाग १.

प्रथमारंभींचे ठराव.

कलमें.

१. ल्हान सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

२. रद्द करणें.

३. व्याख्या.

भाग २.

जमीन घेणें.

पूर्व तपास.

४. पूर्व जाहिरनामा प्रसिद्ध करणें, व त्यानंतर अमलदारांचे अधिकार.

५. नुकसानीचा मोबदला देणें.

जमीन घेण्याच्या इराद्याबाबद ठराव.

६. सार्वजनिक कामाकरितां जमिनीची जरूरी असल्याबाबद ठराव.

७. ठराव झाल्यानंतर कलेक्टरानें जमीन घेण्याविषयीं तजवीज करणें.

८. जमिनीवर हद्दी वगैरे दर्शविणें, ती मोजणें व तिचा नकाशा काढणें.

कलमें.

९. हितसंबंध असणाऱ्या मनुष्यांस नोटीस.

१०. नांवें व हितसंबंध सांगण्याविषयीं फर्माविण्याचा व भाग पाडण्याचा अधिकार.

मोजणी किंमत व दावे यांविषयीं कलेक्टरानें चौकशी करणें, व निवाडा देणें.

११. कलेक्टरानें चौकशी करणें व निवाडा देणें.

१२. कलेक्टराचा निवाडा केव्हां अखेरचा समजणें.

१३. चौकशी तहकूब ठेवणें.

१४. साक्षीदारांस समानें करण्याचा व हजर होण्याविषयीं भाग पाडण्याचा आणि दस्तऐवज हजर करण्याविषयीं भाग पाडण्याचा अधिकार.

१५. कोणत्या गोष्टींचा विचार करणें व कोणत्या सोडणें तें.

कबजा घेणें.

१६. कबजा घेण्याचा अधिकार.

१७. निकडीच्या प्रसंगीं विशेष अधिकार.

## भाग ३.

### कोर्टास लिहून पाठविणें व त्यावर काम चालविण्याची रीति.

कलमें.

१८. कोर्टास लिहून पाठविणें.

१९. कलेक्टरानें कोर्टास लिहून पाठवावयाचा मजकूर.

२०. नोटीस बजाविणें.

२१. कोर्टापुढें चालावयाच्या कामाची यत्ता.

२२. खुल्या कोर्टांत काम चालविणें.

२३. मोबदला ठरवितेवेळीं ज्या बाबतींचा विचार करावयाचा त्या.

२४. मोबदला ठरवितांना ज्या बाबती सोडून याव-याच्या त्या.

२५. मोबदल्याच्या रकमेबाबद नियम.

२६. निवाड्यांचा नमुना.

२७. खर्च.

२८. जादा मोबदल्यावर कलेक्टरानें व्याज द्यावें असें फर्माविण्याचा अधिकार.

---

## भाग ४.

### मोबदल्याची वांटणी.

२९. वांटणीचा तपशील लिहिणें.

३०. वांटणीबाबद तकरार.

---

## भाग ५.

### पैका देणें.

३१. मोबदल्याचा पैका देणें किंवा तो कोर्टांत अ-मानत ठेवणें.

३२. दुमाला करण्याचा अधिकार नसणाऱ्या मनुष्यांच्या जमिनींसंबंधीं अमानत ठेवले-ल्या पैक्याची व्यवस्था.

३३. इतर प्रसंगीं अमानत ठेवलेल्या पैक्याची व्यवस्था.

३४. व्याज देणें.

---

## भाग ६.

### जमिनीचा थोडक्या मुदतीपर्यंत भोगवटा.

३५. पड किंवा लागवड जमिनीचा थोडक्या मुदतीपर्यंत भोगवटा. मोबदल्याविषयीं मतभेद पडेल तेव्हां काम चालविण्याची रीति.

कलमें.

३६. जमिनीवर जाऊन कबजा घेण्याचा अधिकार, व ती परत देतांना मोबदला देणें.

३७. जमिनीच्या स्थितीविषयीं मतभेद.

---

## भाग ७.

### कंपन्यांसाठीं जमीन घेणें.

३८. जमिनीवर जाऊन पाहणी करण्याचा कंपनी-स अखत्यार देण्याचा अधिकार आहे.

३९. स्थानिक सरकारचें अगोदर अनुमत घेणें व करारनामा करून देणें जरूर आहे.

४०. पूर्व चौकशी.

४१. सेक्रेटरी आफ् स्टेट इन् कौन्सिल यांच्याशीं करारनामा.

४२. करारनामा प्रसिद्ध करणें.

४३. कलमें ३९ ते ४२ हीं, कंपन्यांस जमीन देण्याविषयीं ज्या बाबतींत सरकार करार-नाम्यावरून बद्ध झालें असेल त्या बाबतींस लागू नाहींत.

४४. रेलवे कंपनीच्या व स्टेट सेक्रेटरीच्या दर्म्यान करारनामा असल्याची कशी शाबिती क-रावी.

---

## भाग ८.

### किरकोळ.

४५. नोटिशीची बजावणी.

४६. जमीन घेण्यास हरकत करण्याबद्दल शिक्षा.

४७. माजिस्ट्रेटानें जमीन स्वाधीन करण्याचें भाग पाडणें.

४८. जमीन घेण्याचें काम पुरें करणें अवश्य नाहीं, परंतु तें पुरें केलें नसेल तेव्हां मोबदला दिला पाहिजे.

४९. घराचा किंवा इमारतीचा कांहीं भाग घेण्या-बाबद.

५०. स्थानिक अधिकाऱ्याच्या किंवा कंपनीच्या खर्चानें जमीन घेणें.

५१. स्टांपड्यूटीची व फीची माफी.

५२. या आक्टास अनुसरून केलेल्या कोणत्याही गो-ष्टीबद्दल दावा करणें असेल तेव्हां नोटीस देणें.

५३. दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा कोर्टापुढें चालणाऱ्या कामास लागू आहे.

५४. कोर्टापुढें चाललेल्या कामांवर अपिलें.

५५. कानू करण्याचा अधिकार.

## सार्वजनिक कामांकरितां व कंपन्यांकरितां जमीन घेण्याबाबदचा कायदा सुधारण्याविषयीं आक्ट.

ज्याअर्थीं सार्वजनिक कामांकरितां व कंपन्यांकरितां लागणारी जमीन घेण्याबाबदचा आणि अशी जमीन घेण्याबद्दल द्यावयाच्या मोबदल्याची रकम ठरविण्याबाबदचा कायदा सुधारणें योग्य आहे; त्याअर्थीं पुढीलप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहेः—

---

### भाग १.

#### प्रथमारंभींचे ठराव.

१. (१) ह्या कायद्यास, सन १८९४ चा जमीन घेण्याविषयीं आक्ट, असें ह्मणावें. लहान सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

(२) तो सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे; आणि

(३) तो सन १८९४ च्या मार्च महिन्याच्या पहिल्या तारखेस अमलांत येईल.

२. (१) सन १८७० चा जमीन घेण्याविषयींचा आक्ट, आणि सन १८८४ चा पंजाबांतील कोर्टांबाबद आक्ट, कलम ७४, हीं या कलमावरून रद्द केलीं आहेत. रद्द करणें.

(२) परंतु सदरीं सांगितलेल्या जमीन घेण्याविषयींच्या आक्टाअन्वयें सुरू केलेलीं सर्व कामें, नेमलेले किंवा अख्त्यार दिलेले सर्व अमलदार, प्रसिद्ध केलेले सर्व करारनामे व केलेल्या सर्व कानू, या गोष्टी, शक्य असेल तेथवर, या आक्टाअन्वयें केल्या आहेत असें मानलें पाहिजे.

(३) कोणत्याही कायद्यांत किंवा दस्तऐवजांत, सदरीं सांगितलेल्या जमीन घेण्याविषयींच्या आक्टाचा किंवा त्या आक्टावरून रद्द केलेल्या कोणत्याही कायद्याचा उल्लेख केला असेल तो, शक्य असेल तेथवर, या आक्टाचा किंवा त्याच्या जुळत्या भागाचा केला आहे असें समजलें पाहिजे.

३. या आक्टांत, विषयास किंवा संदर्भास कांहीं बाध येत नसेल तर,— व्याख्या.

(अ) "जमीन" या शब्दांत, जमिनींतून उत्पन्न होणाऱ्या फायद्यांचा, आणि भूमीस जोडलेल्या वस्तूंचा किंवा भूमीस जोडलेल्या कोणत्याही वस्तूस कायम जडलेल्या वस्तूंचा समावेश होतो असें समजावें:

(ब) "हितसंबंध असणारा मनुष्य" या संज्ञेंत, या आक्टाअन्वयें जमीन घेण्याबद्दल द्यावयाच्या मोबदल्यांत आपला हितसंबंध असल्याबद्दल दावा सांगणाऱ्या सर्व मनुष्यांचा समावेश होतो; आणि जर कोणत्याही मनुष्याचा कोणत्याही जमिनीस लागू असणाऱ्या सवलतींत हितसंबंध असेल तर त्याचा अशा जमिनींत हितसंबंध आहे असें समजलें पाहिजेः

(क) "कलेक्टर" या शब्दाचा अर्थ जिल्ह्याचा कलेक्टर असा असून त्यांत, डिपुटी कमिशनर व या आक्टाअन्वयें कलेक्टरचीं कामें चालविण्याकरितां स्थानिक सरकारानें मुद्दाम नेमलेला कोणताही अमलदार यांचा समावेश होतो असें समजावें:

(ड) "कोर्ट" या शब्दाचा अर्थ, या आक्टाअन्वयें विवक्षित कोर्टाचीं कामें करण्याकरितां कोणत्याही निर्दिष्ट केलेल्या प्रदेशांत स्थानिक सरकारा-

नें स्पेशल जुडिशल आफिसर (त्या सरकारास या आक्टावरून नेमण्याचा अधिकार असल्याप्रमाणें) नेमला नसेल तर, अवल अधिकाराचें मुख्य दिवाणी कोर्ट असा समजावा:

(ई) "कंपनी" या शब्दाचा अर्थ, सन १८८२ चा हिंदुस्थानचा कंपन्यांविषयीं आक्ट याअन्वयें, किंवा सन १८६२ पासून सन १८९० पर्यंत झालेले (इंग्लंड देशाचे) कंपन्यांविषयीं आक्ट यांअन्वयें नोंदलेली, किंवा पार्लेमेंटच्या किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या आक्टावरून, किंवा बादशाही चार्टर किंवा लेटर्स पेटंट या सनदेवरून संस्थापित केलेली कंपनी असा समजावा:

(फ) "सार्वजनिक काम" या संज्ञेंत, ज्या जिल्ह्यांमध्यें गांवठाणांकरितां जागा देण्याची स्थानिक सरकारची चाल आहे असें सरकारी गझेटांत जाहिरनामा देऊन अशा सरकारानें महशूर केलें असेल, त्या जिल्ह्यांमध्यें अशी जागा देणें या गोष्टीचा समावेश होतो असें समजावें: आणि

(ग) खालीं सांगितलेलीं मनुष्यें हीं, पुढें सांगितलें आहे त्याप्रमाणें व तितक्या इयत्तेपर्यंत, "काम चालविण्याचा हक्क असणारीं" मनुष्यें होत असें समजावें (ह्मणजे)—

फायद्याचा हितसंबंध असणाऱ्या मनुष्यांचे ट्रस्टी [जिम्मेदार] हे तशा प्रसंगीं काम चालविण्याचा हक्क असणारे मनुष्य होत असें समजावें, आणि फायद्याचा हितसंबंध असणारीं मनुष्यें नालायक नसतीं तर जितक्या इयत्तेपर्यंत तीं काम चालवूं शकतीं तितक्या इयत्तेपर्यंत सदरहू ट्रस्टींचा काम चालविण्याचा हक्क आहे असें समजावें;

इंग्लंड देशाचा कायदा लागू असेल त्या प्रसंगीं, लग्न झालेली स्त्री, मग ती वयांत आलेली असो किंवा नसो, तथापि ती लग्न न झालेली असून वयांत आलेली असती तर जितक्या इयत्तेपर्यंत काम चालविण्याचा तिला हक्क असता तितक्या इयत्तेपर्यंत काम चालविण्याचा तसा हक्क असणारी मनुष्य होय असें समजावें;

अल्पवयी मनुष्यांचे पालनकरणारे व वेड्या किंवा खुळ्या मनुष्यांकरितां असणाऱ्या कमिटी किंवा वेड्या किंवा खुळ्या मनुष्यांचे व्यवस्थापक हीं अनुक्रमें, अशीं अल्पवयी, वेडीं किंवा खुळीं मनुष्यें नालायक नसतीं तर तीं स्वतः जितक्या इयत्तेपर्यंत काम चालवूं शकतीं तितक्या इयत्तेपर्यंत काम चालविण्याचा तसा हक्क असणारीं मनुष्यें होत असें समजावें:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं—

(१) ज्या कोणत्याही मनुष्याचा हितसंबंध दुसऱ्या कोणत्याही हितसंबंध असणाऱ्या मनुष्याच्या हितसंबंधाविरुद्ध नसता तर त्याला अशा दुसऱ्या मनुष्याबद्दल काम चालविण्याचा हक्क असता, अशा मनुष्याच्या दाव्याच्या विषयांतील हितसंबंध अशा हितसंबंध असणाऱ्या मनुष्याच्या हितसंबंधाशीं विरुद्ध आहे असें कलेक्टराच्या किंवा कोर्टाच्या खातरीलायक दाखविण्यांत आल्यास, त्या मनुष्यास काम चालविण्याचा हक्क आहे असें समजूं नये;

(२) अशा दरेक बाबतींत, हितसंबंध असणाऱ्या मनुष्यास आपल्या इष्टमित्रामार्फत हजर होण्याचा अधिकार आहे, किंवा, तो इष्टमित्रामार्फत हजर न झाल्यास, प्रसंगाप्रमाणें कलेक्टरानें किंवा कोर्टानें, त्याच्या वतीनें दाव्याचें काम चालविण्यासाठीं दाव्यापुरता पालनकरणारा नेमिला पाहिजे;

(३) या आक्टाअन्वयें चालविलेल्या कामांच्या वेळीं, हितसंबंध असणारीं मनुष्यें कलेक्टरापुढें किंवा कोर्टापुढें इष्टमित्रामार्फत किंवा दाव्यापुरता नेमलेला पालनकरणारा याच्या मार्फत हजर होतील त्यांच्या बाबतींत, दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयीं कायदा, याच्या ३१ व्या बाबींतील ठराव, जरूरीच्या फेरफारांनिशीं, लागू होतील असें समजावें; आणि

(४) "काम चालविण्याचा हक्क असणाऱ्या" कोणत्याही मनुष्यास, ज्या मनुष्याबद्दल काम चालविण्याचा त्याला हक्क असेल त्यास द्यावयाचा मोबदल्याचा पैका घेण्याचा अधिकार, जमीन आपखुशीनें विकली असतां ती दुमाला करण्याचा व तिच्या विक्रीचा पैका घेऊन त्याबद्दल चोख फारिखत देण्याचा अधिकार त्यास नसेल तर, नाहीं असें समजावें.

---

## भाग २.

### जमीन घेणें.

#### पूर्व तपास.

४. (१) अमुक प्रदेशांतील जमिनीची अमुक सार्वजनिक कामाकरितां जरूरी लागण्याचा संभव आहे असें स्थानिक सरकारास दिसेल, तेव्हां त्याप्रमाणें सरकारी गॅझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध केला पाहिजे, आणि कलेक्टरानें त्या जाहिरनाम्याच्या मतलबाची जाहीर नोटीस सदरहू प्रदेशांत सोईवार जागांमध्यें देवविली पाहिजे. पूर्वं जाहिरनामा प्रसिद्ध करणें, व त्यानंतर अमलदाराचे अधिकार.

(२) त्यानंतर, सदरहू सरकारानें सामान्यतः किंवा विशेषतः त्याबाबद [पुढील गोष्टींबाबद] अधिकार दिलेल्या कोणत्याही अमलदारास, आणि त्याचे नोकर व कामकरी यांस,—

सदरहू प्रदेशांतील कोणत्याही जमिनीवर जाऊन तिची पाहणी करण्याचा व तिच्या लेव्हल घेण्याचा;

अशा जमिनीचे आंतले थर खणण्याचा किंवा तींत भोंक पाडण्याचा;

अशी जमीन सदरहू कामाकरितां योग्य आहे किंवा कसें याचा निर्णय करण्यासाठीं जरूर असणारीं इतर सर्व कृत्यें करण्याचा;

द्यावयाची योजिली असेल त्या जमिनीच्या हद्दी, आणि तिजवर कोणतेंही काम करावयाचें योजिलें असल्यास त्या कामाच्या सीमेची उद्दिष्ट रेषा आंखण्याचा;

सदरहू लेव्हल, हद्दी व सीमेची रेषा, निशाण्या करून व चर खणून दर्शविण्याचा;

आणि, जेथें इतर रीतीनें पाहणी पुरी करतां येत नसेल व लेव्हल घेतां येत नसतील आणि हद्दी व सीमेची रेषा ह्या दर्शवितां येत नसतील, तेथें कोणत्याही उभ्या पिकाचा, कुडणाचा किंवा जंगलाचा कोणताही भाग कापून साफ करण्याचा, अधिकार आहे:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं कोणत्याही मनुष्यानें कोणत्याही इमारतींत किंवा राहत्या घराच्या कोणत्याही कुडलेल्या आवारांत किंवा बागेंत, (तिच्या किंवा त्याच्या भोगवटाकरणाराचें अनुमत नसेल तर), अशा भोगवटाकरणारास आपल्या तशा इराद्याची निदान सात दिवस अगोदर नोटीस दिल्यावांचून, जातां कामा नये.

५. सदरहूप्रमाणें अधिकार मिळालेल्या अमलदारानें सदरीलप्रमाणें जातेवेळीं, सदरहूप्रमाणें होणाऱ्या सर्व जरूरीच्या नुकसानीबद्दल पैका दिला पाहिजे किंवा दे- नुकसानीचा मोबदला देणें.

ण्यास काढला पाहिजे, आणि याप्रमाणें दिलेल्या किंवा देण्यास काढलेल्या रकमेच्या पुरतेपणाबाबद तकरार उत्पन्न झाल्यास, ती निकालाकरितां कलेक्टराकडे किंवा जिल्ह्याच्या इतर मुख्य मुलकी अमलदाराकडे एकदम लिहून पाठविली पाहिजे, आणि असा निकाल अखेरचा समजला पाहिजे.

## जमीन घेण्याच्या इरादाबाबद ठराव.

सार्वजनिक कामाकरितां जमिनीची जरूरी असल्याबाबद ठराव.

६. (१) अमुक जमीन सार्वजनिक कामासाठीं किंवा कंपनीसाठीं जरूर आहे असें स्थानिक सरकारास दिसेल तेव्हां, या आक्टाच्या ७ व्या भागांतील ठरावांकडे लक्ष पुरवून, तशा मतलबाचा ठराव त्या सरकारच्या सेक्रेटरीच्या सहीनिशीं किंवा त्या सरकारच्या हुकुमांवर सही करण्याचा योग्य रीतीनें अधिकार मिळालेल्या कोणत्या तरी अमलदाराच्या सहीनिशीं केला पाहिजे :

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं असा कोणताही ठराव, सदरहू जमिनीबद्दल द्यावयाचा मोबदला कंपनीकडून, किंवा सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं सरकारी महसुलांतून किंवा स्थानिक अधिकाऱ्याच्या निर्बंधाखालील किंवा व्यवस्थेखालील कोणत्या तरी फंडांतून अदा करावयाचा असल्यावांचून, करतां कामा नये.

(२) सदरहू ठराव सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध केला पाहिजे आणि त्यांत, सदरहू जमीन कोणत्या जिल्ह्यांत किंवा मुलखाच्या इतर भागांत आहे, ती कोणत्या कामाकरितां पाहिजे आहे, तिचें अजमासें क्षेत्रफळ किती आहे, आणि तिचा नकाशा काढलेला असल्यास, तो कोणत्या जागीं पाहण्यास मिळेल, तें लिहिलें पाहिजे.

(३) सदरहू ठराव, सदरील जमीन प्रसंगाप्रमाणें सार्वजनिक कामासाठीं किंवा कंपनीसाठीं जरूर असल्याविषयीं निरुत्तर पुरावा होईल; आणि तो ठराव केल्यानंतर स्थानिक सरकारास या आक्टांत पुढें सांगितलेल्या रीतीनें ती जमीन घेण्याचा अधिकार आहे.

ठराव झाल्यानंतर कलेक्टरानें जमीन घेण्याविषयीं तजवीज करणें.

७. जेव्हां कोणतीही जमीन सार्वजनिक कामासाठीं किंवा कंपनीसाठीं पाहिजे आहे असा सदरीलप्रमाणें ठराव होईल, तेव्हां स्थानिक सरकारानें, किंवा त्याबाबद स्थानिक सरकारानें अधिकार दिलेल्या कोणत्या तरी अमलदारानें, कलेक्टरास सदरहू जमीन घेण्याची तजवीज करण्याविषयीं फर्माविलें पाहिजे.

जमिनीवर हद्दी वगैरे दर्शीविणें, ती मोजणें व तिचा नकाशा काढणें.

८. नंतर कलेक्टरानें सदरहू जमिनीवर (४थ्या कलमाअन्वयें अगोदर दर्शविलेल्या नसल्यास) हद्दी वगैरे दर्शविण्यांत येतील अशी तजवीज केली पाहिजे. तसेंच त्यानें ती जमीन मोजविली पाहिजे, आणि तिचा नकाशा (काढलेला नसल्यास) काढविला पाहिजे.

हितसंबंध असणाऱ्या मनुष्यांस नोटीस.

९. (१) मग कलेक्टरानें, सदरहू जमीन कबज्यांत घेण्याचा सरकारचा इरादा आहे, आणि त्या जमिनींतील सर्व हितसंबंधांबद्दल मिळावयाच्या मोबदल्याविषयीं दावे आपणांकडे करावे, अशा मजकुराची जाहीर नोटीस घ्यावयाच्या जमिनीवरील किंवा त्या जमिनीजवळील सोईवार जागांमध्यें देवविली पाहिजे.

(२) सदरील नोटिशींत, सदरहूप्रमाणें जरूर असणाऱ्या जमिनीचा तपशील असला पाहिजे; आणि, त्या जमिनींत हितसंबंध असणाऱ्या सर्व मनुष्यांस त्या नोटिशींत सांगितलेल्या वेळीं व जागीं (ही वेळ अशी नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेनंतर पंधरा दिवसांहून कमी असूं नये) कलेक्टरापुढें जातीनें किंवा मुखत्यारामार्फत हजर होण्याविषयीं, आणि सदरहू जमिनींतील आपापल्या हितसंबंधाचा प्रकार आणि या हितसंबंधांबद्दल मिळावयाच्या मोबदल्याविषयींच्या आपापल्या दाव्यांची रकम व तपशील, आणि ८व्या कलमाअन्वयें केलेल्या मोजणीस त्यांच्या कांहीं हरकती असल्यास त्याही सांगण्याविषयीं फर्माविलेलें असलें पाहिजे. सदरीलप्रमाणें सांगावयाचा मजकूर कोणत्याही प्रसंगीं पक्षकाराच्या किंवा त्याच्या मुखत्याराच्या सहीनिशीं लेखी मागण्याचा कलेक्टरास अधिकार आहे.

(३) त्याचप्रमाणें कलेक्टरानें तशाच मतलबाची नोटीस, सदरहू जमिनीचा कोणी भोगवटाकरणारा असल्यास त्यावर, आणि तींत ज्या मनुष्यांचा हितसंबंध आहे असें किंवा ज्यांस असा हितसंबंध असणाऱ्या मनुष्यांबद्दल काम चालविण्याचा हक्क आहे असें माहीत असून किंवा वाटत असून जीं, ती जमीन ज्या रेव्हिन्यू डिस्ट्रिक्टांत असेल त्यांत राहत असतील किंवा तेथें त्यांच्या तर्फे नोटीस घेण्याचा अधिकार असणारे त्यांचे मुखत्यार असतील, त्या सर्व मनुष्यांवरही बजाविली पाहिजे.

(४) सदरहूप्रमाणें हितसंबंध असणारा कोणताही मनुष्य इतर ठिकाणीं राहत असून त्याचा सदरहू प्रकारचा मुखत्यार नसला, तर सदरहू नोटीस त्याला, त्याचें अखेरचें राहण्याचें ठिकाण, पत्ता किंवा धंद्याची जागा माहीत असेल तेथें हिंदुस्थानचा सन १८६६ चा पोस्ट आफिसाचा आक्ट याच्या ३ ऱ्या भागाअन्वयें रजिस्टर केलेल्या एका पत्रांत टपालांतून पाठविली पाहिजे.

नांवें व हितसंबंध सांगण्याविषयीं फर्माविण्याचा व भाग पाडण्याचा अधिकार.

१०. (१) तसेंच कलेक्टरास, सदरहू कोणत्याही मनुष्याला पुढीलप्रमाणें मजकूर सांगण्याविषयीं किंवा तो स्वाधीन करण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार आहे, ह्मणजे सदरहू जमिनींत किंवा तिच्या कोणत्याही भागांत, सहमालक, पोटमालक, गहाणघेणारा किंवा कूळ या नात्यानें किंवा इतर रीतीनें दुसऱ्या कोणत्याही मनुष्याचा कोणताही हितसंबंध असेल तशा दरेक मनुष्याचें नांव, आणि अशा हितसंबंधाचा प्रकार, आणि अशा मजकुराच्या तारखेलगतच्या मागल्या तीन सालांबद्दल त्या हितसंबंधाअन्वयें कांहीं भाडें व उत्पन्न हीं घेतलेलीं किंवा घ्यावयाचीं असल्यास तीं, येणेंप्रमाणें मजकूर, सांगितलेल्या वेळीं व जागीं ( ही वेळ सदरहूप्रमाणें फर्माविल्याच्या तारखेनंतर पंधरा दिवसांहून कमी असूं नये ), शक्य असेल तेथवर, आपणापाशीं सांगण्याविषयीं किंवा स्वाधीन करण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार आहे.

(२) ज्या मनुष्यास या कलमाअन्वयें किंवा ९ व्या कलमाअन्वयें मजकूर सांगण्यास किंवा स्वाधीन करण्यास फर्माविलें असेल तशा दरेक मनुष्यास, हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींचा कायदा, कलमें १७५ व १७६, यांच्या अर्थाप्रमाणें, सदरहूप्रमाणें मजकूर सांगणें किंवा स्वाधीन करणें कायद्याअन्वयें भाग आहे असें समजावें.

### मोजणी, किंमत व दावे यांविषयीं कलेक्टरानें चौकशी करणें, व निवाडा देणें.

कलेक्टरानें चौकशी करणें व निवाडा देणें.

११. सदरहूप्रमाणें नेमलेल्या दिवशीं, किंवा ज्या कोणत्याही दुसऱ्या दिवसापर्यंत चौकशीचें काम तहकूब ठेविलें असेल त्या दिवशीं, कलेक्टरानें, ८ व्या कलमाअन्वयें केलेल्या मोजणीस हितसंबंध असणाऱ्या कोणत्याही मनुष्यानें ९ व्या कलमाअन्वयें दिलेल्या नोटिशीस अनुसरून कांहीं हरकती सांगितल्या असल्यास त्यांबाबद, व सदरहू जमिनीच्या किंमतीबाबद, आणि मोबदल्याविषयीं दावा सांगणाऱ्या दरेक मनुष्याचा किती किती हितसंबंध आहे यांबाबद चौकशी करण्याच्या कामास लागलें पाहिजे, आणि पुढील गोष्टींविषयीं, ह्मणजे—

(१) सदरहू जमिनीच्या खऱ्या क्षेत्रफळाविषयीं;

(२) त्या जमिनीबद्दल जो मोबदला द्यावा असें त्यास वाटेल त्याविषयीं; आणि

(३) त्या जमिनींत ज्या मनुष्यांचा हितसंबंध असल्याचें माहीत असून किंवा वाटत असून, ज्यांची किंवा ज्यांच्या दाव्यांची त्याला खबर मिळाली असेल, मग ते त्याच्यापुढें हजर झालेले असोत किंवा नसोत, त्या सर्वांमध्यें सदरहू मोबदल्याची कसकशी वांटणी करावयाची त्याविषयीं,

आपल्या सहीनिशीं निवाडा दिला पाहिजे.

कलेक्टराचा निवाडा केव्हां अखेरचा समजणें.

१२. (१) सदरहू निवाडा कलेक्टराच्या कचेरींत फैल केला पाहिजे, आणि, या आक्टांत पुढें ठरविलें आहे तेवढें खेरीज करून, तो अखेरचा समजला पाहिजे, आणि तो

कलेक्टराच्या व हितसंबंध असणाऱ्या मनुष्यांच्या दर्म्यान, मग ते कलेक्टरापुढें हजर झालेले असोत किंवा नसोत, सदरहू जमिनीचें खरें क्षेत्रफळ व किंमत यांविषयीं, आणि हितसंबंध असणाऱ्या मनुष्यांमध्यें केलेल्या मोबदल्याच्या वांटणीविषयीं निरुत्तर पुरावा होईल असें समजावें.

(२) कलेक्टरानें आपल्या निवाड्याबाबद, तो देतेवेळीं हितसंबंध असणाऱ्या मनुष्यांपैकीं जे जातीनें किंवा आपल्या प्रतिनिधींमार्फत हजर झालेले नसतील त्यांस तावडतोब नोटीस दिली पाहिजे.

चौकशी तहकूब ठेवणें.

१३. कलेक्टरास, आपणाला योग्य वाटेल तशा कोणत्याही कारणावरून वेळोवेळीं चौकशीचें काम, पुढचा एकादा दिवस आपणच नेमून त्या दिवसापर्यंत तहकूब ठेवण्याचा अधिकार आहे.

साक्षीदारांस समनें करण्याचा व हजर होण्याविषयीं भाग पाडण्याचा आणि दस्तऐवज हजर करण्याविषयीं भाग पाडण्याचा अधिकार.

१४. या आक्टाअन्वयें करावयाच्या चौकशीच्या कारणाकरितां कलेक्टराला, दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा यांत दिवाणी कोर्टांच्या बाबतींत जे उपाय व जी रीति सांगितली आहे त्याच उपायांनीं व (होईल तेथवर) त्याच रीतीनें, संबंध असणारे किंवा त्यांपैकीं कोणतेही पक्षकार यांसुद्धां, साक्षीदारांस समनें करण्याचा व हजर होण्याविषयीं भाग पाडण्याचा, आणि दस्तऐवज हजर करण्याविषयीं भाग पाडण्याचा अधिकार आहे.

कोणत्या गोष्टींचा विचार करणें व कोणत्या सोडणें तें.

१५. मोबदल्याची रकम ठरवितांना कलेक्टरानें, कलमें २३ व २४ यांतील ठरावांकडे लक्ष पुरविलें पाहिजे.

## कबजा घेणें.

कबजा घेण्याचा अधिकार.

१६. कलेक्टरानें ११ व्या कलमाअन्वयें निवाडा केल्यावर त्यास जमिनीचा कबजा घेण्याचा अधिकार आहे, आणि मग या जमिनीवर कोणताच बोजा न राहतां, तिची मालकी पूर्णपणें सरकाराकडे जाईल असें समजावें.

निकडीच्या प्रसंगीं विशेष अधिकार.

१७. (१) सदरहूप्रमाणें निवाडा झाला नसला तथापि, निकडीच्या प्रसंगीं, स्थानिक सरकार फर्मावील तेव्हां कलेक्टरास, कलम ९, पोटकलम (१) यांत सांगितलेली नोटीस प्रसिद्ध केल्यापासून पंधरा दिवसांनंतर, सार्वजनिक कामांकरितां किंवा कंपनीकरितां लागणारी कोणतीही पड किंवा लागवड जमीन कबज्यांत घेण्याचा अधिकार आहे. मग या जमिनीवर कोणताच बोजा न राहतां, तिची मालकी पूर्णपणें सरकाराकडे जाईल असें समजावें.

(२) जेव्हां जेव्हां, कोणत्याही नाव्य नदीच्या प्रवाहांत अकस्मात् कांहीं फेरबदल झाल्यामुळें किंवा दुसऱ्या कोणत्याही आकस्मिक प्रसंगामुळें कोणत्याही रेलवे ॲडमिनिस्ट्रेशनास, आपला व्यापार चालू ठेवण्याकरितां किंवा रिव्हर-साइड [नदीच्या बाजूचें] स्टेशन किंवा घाटस्टेशन करण्याकरितां किंवा अशा कोणत्याही स्टेशनास सोईवार असा रेलवेचा फांटा जोडण्याकरितां किंवा त्यास तसा रस्ता करण्याकरितां कोणत्याही जमिनीचा तावडतोब कबजा घेणें जरूर होईल, तेव्हां तेव्हां कलेक्टरास, पोटकलम (१) यांत सांगितलेली नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर तावडतोब व स्थानिक सरकारची अगोदर मंजुरी घेऊन, त्या जमिनीवर जाऊन तिचा कबजा घेण्याचा अधिकार आहे, आणि मग या जमिनीवर कोणताच बोजा न राहतां, तिची मालकी पूर्णपणें सरकाराकडे जाईल असें समजावें:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, कलेक्टरानें, या पोटकलमाअन्वयें कोणतीही इमारत किंवा इमारतीचा भाग कबज्यांत घेणें असल्यास तो, तिच्या किंवा त्याच्या भोगवटाकरणारास आपल्या तशा इराद्याची निदान अठ्ठेचाळीस तासांची, किंवा सदरहू भोगवटाकरणाराला सदरहू इमारतींतून विनाकारण गैरसोई न होतां त्याची जंगम मत्ता काढून नेण्यास वाजवी रीतीनें पुरेल अशा जास्त मुदतीची नोटीस दिल्यावांचून, घेतां कामा नये.

(३) वरील दोहोंपैकीं कोणत्याही पोटकलमाखालील दरेक बाबतींत कलेक्टरानें, सदरहू जमिनीचा कबजा घेतेवेळीं हितसंबंध असणाऱ्या मनुष्यांस, तिजवर कांहीं उभें पीक व झाडें असल्यास त्यांबद्दल आणि सदरहूप्रमाणें अकस्मात् कबजा घेतल्यामुळें त्यांस झालेल्या व २४ व्या कलमांत न वगळलेल्या दुसऱ्या कोणत्याही नुकसानीबद्दल मोबदला देण्यास काढला पाहिजे; आणि याप्रमाणें देण्यास काढलेला मोबदला मान्य केला नाहीं, तर सदरहू पिकाची व झाडांची किंमत आणि सदरहू दुसऱ्या नुकसानीची रकम ह्या, या आक्टांतील ठरावांअन्वयें सदरहू जमिनीबद्दल मोबदला देण्याविषयीं निवाडा करावयाचा त्यांत धरल्या पाहिजेत.

---

## भाग ३.

### कोर्टास लिहून पाठविणें व त्यावर काम चालविण्याची रीति.

१८. (१) हितसंबंध असणाऱ्या ज्या कोणत्याही मनुष्यास कलेक्टराचा निवाडा मान्य नसेल त्याला, कलेक्टरानें तें प्रकरण निकालाकरितां कोर्टाकडे लिहून पाठवावें अशी कलेक्टरास लेखी अर्जी करण्याचा अधिकार आहे, मग त्याची हरकत जमिनीच्या मोजणीबद्दल असो, मोबदल्याच्या रकमेबद्दल असो, ज्या मनुष्यांस तो द्यावयाचा त्यांबद्दल असो, किंवा हितसंबंध असणाऱ्या मनुष्यांमध्यें मोबदल्याची वांटणी केली असेल तिजबद्दल असो. कोर्टास लिहून पाठविणें.

(२) सदरहू निवाड्यास ज्या कारणांवरून हरकत घेतली असेल तीं कारणें सदरहू अर्जीत नमूद केलीं पाहिजेत :

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, अशी दरेक अर्जी,—

(अ) ती करणारा मनुष्य कलेक्टरानें निवाडा केला त्यावेळीं त्याच्यापुढें स्वतः किंवा प्रतिनिधीमार्फत हजर झाला असल्यास, कलेक्टराच्या निवाड्याच्या तारखेपासून सहा आठवड्यांच्या आंत,

(ब) इतर प्रसंगीं, कलम १२, पोटकलम (२), याअन्वयें कलेक्टराकडून नोटीस पोंहचल्यापासून सहा आठवड्यांच्या आंत, किंवा कलेक्टराच्या निवाड्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आंत, ह्मणजे या दोहोंतून जी मुदत पहिल्यानें संपेल तिच्या आंत,

केली पाहिजे.

१९. (१) सदरीं सांगितल्याप्रमाणें प्रकरण लिहून पाठवितांना कलेक्टरानें कोर्टाच्या माहितीसाठीं पुढील मजकूर आपल्या सहीनिशीं लिहून पाठविला पाहिजे:— कलेक्टरानें कोर्टास लिहून पाठवावयाचा मजकूर.

(अ) विवक्षित जमीन कोठें व किती आहे तें, आणि तिजवर कांहीं झाडें, इमारती किंवा उभें पीक असल्यास त्यांचा तपशील;

(ब) या जमिनींत ज्या मनुष्यांचा हितसंबंध आहे असें वाटण्यास त्याला कारण असेल त्या मनुष्यांचीं नांवें;

(क) कलमें ९ व १७ यांअन्वयें किंवा यांपैकीं कोणत्याही एका कलमाअन्वयें जी रकम नुकसानीबद्दल ठरवून दिली असेल किंवा देण्यास काढली असेल ती रकम, आणि ११ व्या कलमाअन्वयें ठरविलेली मोबदल्याची रकम; आणि

(ड) सदरहू हरकत मोबदल्याच्या रकमेबाबद असल्यास, ती रकम ज्या कारणांवरून ठरविली असेल तीं कारणें.

(२) सदरहू मजकुरास एक परिशिष्ट जोडून त्यांत हितसंबंध असणाऱ्या निरनिराळ्या पक्षकारांवर बजाविलेल्या नोटिशींचा, आणि अशा पक्षकारांकडून घेतलेल्या किंवा त्यांनीं स्वाधीन केलेल्या लेखी मजकुरांचा तपशील दिला पाहिजे.

नोटीस बजाविणें.

२०. नंतर कोर्टानें, पुढील मनुष्यांवर, ह्मणजे—

(अ) अर्जदारावर,

(ब) सदरहू हरकतींत हितसंबंध असणाऱ्या मनुष्यांपैकीं कोणी ठरविलेला मोबदला तक्रारीवांचून घेण्यास कबूल असल्यास त्यांखेरीज दुसऱ्या सर्व मनुष्यांवर, आणि

(क) सदरहू हरकत जमिनीच्या क्षेत्रफळाबाबद किंवा मोबदल्याच्या रकमेबाबद असल्यास, कलेक्टरावर,

एक नोटीस बजावविली पाहिजे. तींत सदरहू हरकतीचा निकाल करण्याच्या कामास कोर्ट ज्या दिवशीं सुरुवात करणार असेल तो दिवस सांगितला पाहिजे, आणि त्या दिवशीं सदरहू मनुष्यांनीं कोर्टापुढें हजर व्हावें असें फर्माविलेलें असलें पाहिजे.

कोर्टापुढें चालावयाच्या कामाची यत्ता.

२१. सदरहू प्रकारच्या दरेक कामामध्यें चौकशी करणें ती फक्त सदरील हरकतीशीं संबंध असणाऱ्या मनुष्यांच्या हितसंबंधांचा विचार करण्यापुरतीच करावयाची असें समजावें.

खुल्या कोर्टांत काम चालविणें.

२२. सदरहू प्रकारचें दरेक काम खुल्या कोर्टांत चालविलें पाहिजे, आणि ज्या मनुष्यांस विवक्षित प्रांतांतील कोणत्याही दिवाणी कोर्टांत वकिलीचें काम चालविण्याचा अधिकार असेल त्या सर्वांस, सदरहू कामांत (प्रसंगाप्रमाणें) हजर होण्याचा, जाबजबाब देण्याचा व काम करण्याचा अधिकार आहे.

मोबदला ठरवितेवेळीं ज्या बाबतींचा विचार करावयाचा त्या.

२३. (१) या आक्टाअन्वयें घेतलेल्या जमिनीबद्दल द्यावयाच्या मोबदल्याची रकम ठरवितांना, कोर्टानें पुढील बाबतींचा विचार केला पाहिजे :—

१ ली.— ६ व्या कलमाअन्वयें सदरहू जमिनीबाबद ठराव प्रसिद्ध केल्याच्या तारखेस असणारी तिची बाजारकिंमत ;

२ री.—कलेक्टरानें सदरहू जमिनीचा कबजा घेतेवेळीं तिजवर असणारें कोणतेंही उभें पीक किंवा झाडें घेतल्याकारणानें हितसंबंध असणाऱ्या मनुष्यास जी नुकसानी झाली असेल ती ;

३ री.—कलेक्टरानें सदरहू जमिनीचा कबजा घेतेवेळीं, हितसंबंध असणाऱ्या मनुष्याची, ही जमीन त्याच्या इतर जमिनीपासून वेगळी केल्याकारणानें, कोणतीही नुकसानी झाली असल्यास ती ;

४ थी.—कलेक्टरानें सदरहू जमिनीचा कबजा घेतेवेळीं, हितसंबंध असणाऱ्या मनुष्याची, ती जमीन घेण्यानें त्याच्या इतर जंगम किंवा स्थावर मालमिळकतीस इतर कोणत्याही रीतीनें बाधा झाल्याकारणानें किंवा त्याच्या प्राप्तीस बाधा झाल्याकारणानें, कोणतीही नुकसानी झाली असल्यास ती ;

५ वी.—जर कलेक्टरानें सदरहू जमीन घेतल्यामुळें हितसंबंध असणाऱ्या मनुष्यास आपलें राहण्याचें ठिकाण किंवा धंद्याची जागा बदलणें भाग पडलें असेल, तर याप्रमाणें तें ठिकाण किंवा जागा बदलण्यासंबंधीं कांहीं वाजवी खर्च आला असल्यास तो ; आणि

६ वी.—६ व्या कलमाअन्वयें ठराव प्रसिद्ध झाल्या वेळाच्या व कलेक्टरानें सदरहू जमिनीचा कबजा घेतल्या वेळाच्या दर्म्यान त्या जमिनीचें उत्पन्न कमी होऊन खरोखर कांहीं नुकसानी झाली असल्यास ती.

(२) सदरहू जमिनीच्या सदरीं सांगितलेल्या बाजार-किंमतीखेरीज आणखी कोर्टानें दरेक बावतींत, ही जमीन जबरीनें घेतली असल्याकारणानें, सदरहू बाजार-किंमतीवर दरशेंकडा पंधरा टक्केप्रमाणें जास्त रकम देण्याविषयीं ठराव केला पाहिजे.

मोबदला ठरवितांना ज्या बावती सोडून द्यावयाच्या त्या.

२४. परंतु कोर्टानें पुढील बावतींचा विचार करतां कामा नयेः—

१ ली.—जमीन घेण्याची निकड किती होती तें;

२ री.—घेतलेली जमीन देण्याविषयीं हितसंबंध असणाऱ्या मनुष्याची नाखुशी असल्यास ती;

३ री.—जी नुकसानी कोणा खासगी मनुष्याकडून झाली असती तर तिजबद्दल दावा होण्यास तो मनुष्य पात्र झाला नसता, अशी कोणतीही नुकसानी हितसंबंध असणाऱ्या मनुष्याची झाली असल्यास ती;

४ थी.—घेतलेली जमीन ज्या उपयोगास लावण्यांत येईल त्या उपयोगानें किंवा त्या उपयोगामुळें त्या जमिनीस कोणतीही नुकसानी, ६ व्या कलमाअन्वयें ठराव प्रसिद्ध झाल्याच्या तारखेनंतर, होण्यासारखी असल्यास ती;

५ वी.—जमीन घेतल्यावर ती ज्या उपयोगास लावण्यांत येईल त्या उपयोगापासून तिची किंमत कांहीं वाढण्यासारखी असल्यास ती;

६ वी.—घेतलेली जमीन ज्या उपयोगास लावण्यांत येईल त्या उपयोगापासून हितसंबंध असणाऱ्या मनुष्याच्या इतर जमिनीची कांहीं किंमत वाढण्यासारखी असल्यास ती; किंवा

७ वी.—घेतलेल्या जमिनीवर कांहीं खर्च किंवा सुधारणा किंवा तिची कांहीं व्यवस्था, ६ व्या कलमाअन्वयें ठराव प्रसिद्ध केल्याच्या तारखेनंतर, कलेक्टराच्या मंजुरीवांचून सुरू केली किंवा केली असल्यास, तो खर्च, सुधारणा किंवा व्यवस्था.

मोबदल्याच्या रकमेबाबद नियम.

२५. (१) जेव्हां, ९ व्या कलमाअन्वयें दिलेल्या कोणत्याही नोटिशीअन्वयें अर्जदारानें मोबदल्याविषयीं दावा केलेला असेल तेव्हां, कोर्टानें त्याला द्यावयाची रकम ठरविणें ती, अशा दाव्यांत मागितलेल्या रकमेहून जास्त किंवा ११ व्या कलमाअन्वयें कलेक्टरानें ठरविलेल्या रकमेहून कमी असतां कामा नये.

(२) जेव्हां अर्जदारानें असा दावा करण्याचा इनकार केला असेल, किंवा तो करण्याचें पुरत्या कारणावांचून (पुरतें कारण आहे किंवा नाहीं हें जज्जानें ठरविणें) वर्जिलें असेल, तेव्हां कोर्टानें ठरवावयाची रकम कलेक्टरानें ठरविलेल्या रकमेहून कोणत्याही प्रसंगीं जास्त असतां कामा नये.

(३) जेव्हां अर्जदारानें असा दावा करण्याचें पुरत्या कारणावरून (पुरतें कारण आहे किंवा नाहीं हें जज्जानें ठरविणें) वर्जिलें असेल, तेव्हां कोर्टानें त्याला द्यावयाची रकम ठरविणें ती, कलेक्टरानें ठरविलेल्या रकमेहून कमी असतां कामा नये, ती जास्त असण्यास हरकत नाहीं.

निवाड्यांचा नमुना.

२६. या भागाअन्वयें केलेला प्रत्येक निवाडा लेखी असून त्यावर जज्जानें सही केली पाहिजे, आणि त्यांत, कलम २३, पोटकलम (१) याच्या पहिल्या बावतीअन्वयें ठरविलेली रकम, आणि तसेंच त्या पोटकलमाच्या दुसऱ्या निरनिराळ्या बावतींअन्वयें कांहीं रकमा ठरविल्या असल्यास त्या, अशी दरेक रकम ज्या कारणांवरून ठरविली असेल त्या कारणांसुद्धां, लिहिल्या पाहिजेत.

खर्च.

२७. (१) त्याचप्रमाणें, अशा दरेक निवाड्यांत, या भागाअन्वयें चालविलेल्या कामांत जो खर्च झाला असेल त्याची रकम, आणि तो कोणीं व कोणत्या हिसेरसीनें द्यावयाचा तें लिहिलें पाहिजे.

(२) जेव्हां कलेक्टराचा निवाडा कायम केला नसेल तेव्हां सदरहू खर्च साधारणतः कलेक्टरानें दिला पाहिजेः मात्र अर्जदाराची मागणी इतकी फाजील आहे किंवा त्यानें आपली हकीकत कलेक्टरापुढें रुजू करण्यामध्यें इतकी निष्काळजी दाखविली आहे कीं त्याला द्यावयाच्या खर्चांतून कांहीं रकम वजा करावी किंवा कलेक्टराच्या खर्चांपैकीं कांहीं भाग त्यानें द्यावा असा कोर्टाचा अभिप्राय पडला तर ती गोष्ट निराळी.

जादा मोबदल्यावर कलेक्टरानें व्याज द्यावें असें फर्माविण्याचा अधिकार.

२८. कलेक्टरानें मोबदल्याची जी रकम ठरवावयास पाहिजे होती असें कोर्टास वाटेल ती रकम जर, कलेक्टरानें ठरविलेल्या मोबदल्याच्या रकमेहून जास्त असेल, तर जास्त असेल तेवढ्या रकमेवर, कलेक्टरानें जमिनीचा कबजा घेतल्या तारखेपासून तों ह्या जास्त रकमेचा कोर्टांत भरणा केल्या तारखेपर्यंत दरसाल दर शेंकडा सहा टक्केप्रमाणें कलेक्टरानें व्याज दिलें पाहिजे असें कोर्टाच्या निवाड्यांत फर्माविण्याचा अधिकार आहे.

---

# भाग ४.

## मोबदल्याची वांटणी.

वांटणीचा तपशील लिहिणें.

२९. जेव्हां हितसंबंध असणारे मनुष्य अनेक असतील तेव्हां, त्यांस मोबदल्याची केलेली वांटणी कबूल असल्यास, अशा वांटणीचा तपशील निवाड्यांत लिहिला पाहिजे, आणि या मनुष्यांच्या दर्म्यान तो निवाडा सदरहू वांटणी बरोबर असल्याविषयीं निरुत्तर पुरावा होईल असें समजावें.

वांटणीबाबद तकरार.

३०. जेव्हां मोबदल्याची रकम ११ व्या कलमाअन्वयें ठरविली असेल तेव्हां, तिच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या वांटणीबाबद, किंवा ती किंवा तिचा कोणताही भाग कोणत्या मनुष्यांस द्यावयाचा याबाबद कोणतीही तकरार उत्पन्न झाल्यास, ती निकालाकरितां कोर्टाकडे लिहून पाठविण्याचा कलेक्टरास अधिकार आहे.

---

# भाग ५.

## पैका देणें.

मोबदल्याचा पैका देणें किंवा तो कोर्टांत अमानत ठेवणें.

३१. (१) कलम ११ याअन्वयें निवाडा केल्यावर कलेक्टरानें आपण ठरविलेल्या मोबदल्याचा पैका निवाड्याप्रमाणें ज्या संबंध असणाऱ्या मनुष्यांस मिळण्याचा हक्क असेल त्यांस तो देण्यास काढला पाहिजे, आणि पुढील लगतच्या पोटकलमांत सांगितलेल्या कोणत्या तरी एक किंवा अनेक गोष्टींमुळें तो देण्यास प्रतिबंध होत नसल्यास, तो सदरहू मनुष्यांस दिला पाहिजे.

(२) जर सदरील पैका घेण्यास ते कबूल नसले, किंवा जमीन दुमाला करण्याचा अधिकार असणारा कोणी मनुष्य नसला, किंवा मोबदला घेण्याविषयींच्या हक्काबाबद किंवा त्याच्या वांटणीबाबद कोणतीही तकरार असली, तर कलेक्टरानें सदरहू मोबदल्याची रकम, १८ व्या कलमाअन्वयें ज्या कोर्टाला लिहून पाठवितां येईल अशा कोर्टांत अमानत ठेविली पाहिजेः

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, हितसंबंध असणारा म्हणून कबूल केलेल्या कोणत्याही मनुष्यास, सदरहू रकमेच्या पुरतेपणाविषयीं आपली तकरार आहे असें सांगून, ती घेण्याचा अधिकार आहेः

असेंही आणखी ठरविण्यांत येतें कीं, ज्या कोणत्याही मनुष्यानें सदरहूप्रमाणें तकरार न करितां सदरहू रकम घेतली असेल त्यास, १८ व्या कलमाअन्वयें अर्जी करण्याचा मुळींच हक्क नाहीं:

तसेंच आणखी असें ठरविण्यांत येतें कीं, या आक्टाअन्वयें ठरविलेला कोणताही मोबदला सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं ज्या कोणत्याही मनुष्यास मिळाला असेल तो मनुष्य, अशा मोबदल्यावर कायदेशीर हक्क असणाऱ्या मनुष्यास तो देण्यास पात्र होत नाहीं, असें या कलमांतील कोणत्याही ठरावावरून समजूं नये.

(३) या कलमांत कोणताही ठराव असला तथापि, कलेक्टरास, स्थानिक सरकारची मंजुरी घेऊन, कोणत्याही जमिनीचा मोबदला पैक्याच्या रूपानें ठरविण्याच्या बदला, या जमिनींत मर्यादित हितसंबंध असणाऱ्या मनुष्यास त्या जमिनीबद्दल दुसऱ्या जमिनी देण्याचा, त्याच सत्ताधिकाराखालीं धारण केलेल्या दुसऱ्या जमिनींवरील जमीनमहसूल सोडण्याचा किंवा सदरहू मनुष्याशीं, विवक्षित पक्षकारांच्या हितसंबंधांकडे दृष्टि देऊन रास्त दिसेल अशी दुसरी कोणतीही तजवीज करण्याचा अधिकार आहे.

(४) सदरहू शेवटच्या पोटकलमांतील कोणत्याही ठरावावरून, सदरहू जमिनींत हितसंबंध असणाऱ्या व तिच्या संबंधानें करार करण्याचा अधिकार असणाऱ्या कोणत्याही मनुष्याशीं कोणतीही तजवीज करण्याच्या कलेक्टराच्या अधिकारास बाध येतो किंवा त्या अधिकाराचा संकोच होतो असें समजूं नये.

३२. (१) सदरील शेवटच्या कलमाचें पोटकलम (२) याअन्वयें कोर्टांत कोणताही पैका अमानत ठेवण्यांत आला असून, ज्या जमिनीबद्दल तो देण्याविषयीं ठराव झाला ती जमीन, ज्याला ती दुमाला करण्याचा अधिकार नव्हता अशा कोणत्याही मनुष्याची होती असें दिसेल, तर कोर्टानें— *दुमाला करण्याचा अधिकार नसणाऱ्या मनुष्यांच्या जमिनींसंबंधीं अमानत ठेवलेल्या पैक्याची व्यवस्था.*

(अ) सदरहू पैका ज्या जमिनीच्या संबंधानें अमानत ठेवण्यांत येईल ती जमीन मालकीच्या ज्या सत्ताधिकारानें व शर्तींनीं धारण केली होती तशाच सत्ताधिकारानें व शर्तींनीं धारण करावयाच्या दुसऱ्या जमिनी त्या पैक्यानें खरीद करण्याविषयीं हुकूम केला पाहिजे, किंवा

(ब) सदरहू खरेदी लगेच करतां येत नसेल, तर कोर्टास योग्य वाटतील तशा सदरहू पैक्याच्या सरकारी किंवा इतर पसंत केलेल्या सिक्युरिटी [व्याजाच्या नोटी] घेण्याविषयीं हुकूम केला पाहिजे;

आणि अशा सिक्युरिटींपासून उत्पन्न होणारें व्याज किंवा इतर प्राप्ति, ज्या मनुष्यास किंवा मनुष्यांस सदरहू जमिनीच्या कबजाचा त्या त्या वेळीं हक्क असता त्या मनुष्यास किंवा मनुष्यांस अदा करण्याविषयीं फर्माविलें पाहिजे, आणि सदरहू पैका—

(१) सदरीं सांगितल्याप्रकारच्या दुसऱ्या जमिनी खरीद करण्यांत येत तोंपर्यंत; किंवा

(२) ज्या कोणत्याही मनुष्यास किंवा मनुष्यांस तो पैका मिळण्याचा पूर्ण हक्क प्राप्त होईल त्या मनुष्यास किंवा मनुष्यांस तो अदा करण्यांत येई तोंपर्यंत,

सदरहूप्रमाणें अमानत ठेवलेला व व्याजीं लावलेला राहील

(२) अमानत ठेवलेल्या पैक्याच्या ज्या ज्या बाबतीस हें कलम लागू आहे तशा दरेक बाबतींत कोर्टानें, पुढील बाबतींचा खर्च, सर्व प्रकारच्या वाजवी आनुषंगिक खर्चासुद्धां, कलेक्टरानें द्यावा असा हुकूम केला पाहिजे, ह्मणजे—

(अ) सदरहूप्रमाणें जमिनी किंवा सिक्युरिटी घेण्याबाबदचा खर्च;

(ब) त्या त्या वेळीं सदरहू पैक्याच्या सिक्युरिटी घेतल्या असतील त्यांचें व्याज किंवा इतर प्राप्ति अदा करण्याबद्दलच्या व असा मुद्दल पैका कोर्टाबाहेर अदा करण्याबद्दलच्या हुकुमांचा, आणि त्यासंबंधीं चाललेल्या सर्व कामाचा खर्च : मात्र परस्परांविरुद्ध दावा सांगणारांच्या दर्म्यान वाद उपस्थित होऊन कोणतेंही काम चालल्यास तें खेरीज होय असें समजावें.

इतर प्रसंगीं अमानत ठेवलेल्या पैक्याची व्यवस्था.

३३. जेव्हां, सदरील शेवटच्या कलमांत सांगितलेल्या कारणाखेरीज इतर कोणत्याही कारणानें कोणताही पैका या आक्टाअन्वयें कोर्टांत अमानत ठेवण्यांत येईल, तेव्हां कोर्टास, अशा पैक्यांत हितसंबंध असणाऱ्या किंवा त्यांत हितसंबंध असल्याबद्दल दावा सांगणाऱ्या कोणत्याही पक्षकाराच्या अर्जावरून, सदरहू पैक्याच्या आपणास योग्य वाटतील तशा सरकारी किंवा इतर पसंत केलेल्या सिक्युरिटी घेण्याविषयीं हुकुम करण्याचा आणि त्यांत हितसंबंध असणाऱ्या पक्षकारांस, ज्या जमिनीच्या संबंधानें असा पैका अमानत ठेविला असेल त्या जमिनीपासून जितका फायदा झाला असता तितकाच, किंवा होईल तितका त्याच्या जवळजवळ, फायदा त्यापासून त्यांस होईल असें कोर्टास वाटेल त्या रीतीनें अशा सिक्युरिटींचें व्याज किंवा इतर प्राप्ति जमवून अदा करण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार आहे.

व्याज देणें.

३४. जेव्हां सदरहू मोबदल्याची रकम जमिनीचा कबजा घेतेवेळीं किंवा घेण्यापूर्वी अदा केली नसेल किंवा अमानत ठेविली नसेल, तेव्हां कलेक्टरानें, ठरविलेली रकम, सदरहू कबजा घेतल्यावेळापासून तों ती अदा करण्यांत किंवा अमानत ठेवण्यांत येई तोंपर्यंत तिजवर दरसाल दरशेंकडा सहाटक्केप्रमाणें व्याजासुद्धां, अदा केली पाहिजे.

---

## भाग ६.

### जमिनीचा थोडक्या मुदतीपर्यंत भोगवटा.

पड किंवा लागवड जमिनीचा थोडक्या मुदतीपर्यंत भोगवटा. मोबदल्याविषयीं मतभेद पडेल तेव्हां काम चालवण्याची रीति.

३५. (१) या आक्टाच्या ७ व्या भागांतील ठरावांस अनुसरून स्थानिक सरकारास, कोणत्याही सार्वजनिक कामासाठीं किंवा कोणत्याही कंपनीसाठीं कोणत्याही पड किंवा लागवड जमिनीचा थोडक्या मुदतीपर्यंत भोगवटा व उपयोग करणें जरूर आहे असें वाटेल, तेव्हां अशा सरकारास, अशा भोगवट्याच्या सुरुवातीपासून तीन वर्षांहून जास्त नसणारी जी मुदत त्या सरकारास योग्य वाटेल त्या मुदतीपर्यंत सदरहू जमिनीचा भोगवटा व उपयोग संपादन करण्याविषयीं कलेक्टराला हुकूम फर्माविण्याचा अधिकार आहे.

(२) मग कलेक्टरानें सदरहू जमिनींत हितसंबंध असणाऱ्या मनुष्यांस, ती जमीन ज्या कामासाठीं पाहिजे असेल त्याबाबद लेखी नोटीस दिली पाहिजे, आणि त्या जमिनीचा सदरीं सांगितलेल्या मुदतीपर्यंत भोगवटा व उपयोग करण्याबद्दल, व तींतून कांहीं वस्तु घ्यावयाच्या असल्यास त्यांबद्दल, स्वतःच्या व सदरहू मनुष्यांच्या दर्म्यान लेखी कबुलायत होऊन ठरेल तसा मोबदला, एका ठोक रकमेनें, किंवा माही किंवा इतर ठरीव मुदतीच्या हप्त्यांनीं, सदरहू मनुष्यांस दिला पाहिजे.

(३) कलेक्टर व हितसंबंध असणारे मनुष्य यांचा मोबदल्याच्या पुरतेपणाविषयीं किंवा त्याच्या वांटणीविषयीं मतभेद पडला, तर कलेक्टरानें ती गोष्ट निकालाकरितां कोर्टास लिहून पाठविली पाहिजे.

जमिनीवर जाऊन कबजा घेण्याचा अधिकार, व ती परत देतांना मोबदला देणें.

३६. (१) सदरहू मोबदला दिल्यावर, किंवा सदरहू कबुलायत झाल्यावर, किंवा ३५ व्या कलमाअन्वयें मतभेदाची गोष्ट लिहून पाठविल्यावर,

कलेक्टरास, सदरहू जमिनीवर जाऊन तिचा कबजा घेण्याचा, आणि सदरहू नोटिशीच्या अटींप्रमाणें त्या जमिनीचा उपयोग करण्याचा किंवा करूं देण्याचा अधिकार आहे.

(२) सदरहू मुदत संपल्यावर कलेक्टरानें सदरहू जमिनींत हितसंबंध असणाऱ्या मनुष्यांस, सदरील कबुलायतींत न धरलेली अशी कोणतीही नुकसानी त्या जमिनीस झाली असल्यास तिजबद्दल मोबदला दिला पाहिजे किंवा देण्यास काढला पाहिजे, आणि ती जमीन तींत हितसंबंध असणाऱ्या मनुष्यांस परत दिली पाहिजे :

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, सदरहू जमिनीचा सदरहू मुदतीच्या सुरुवातीपूर्वी लगत ज्या कामाकरितां उपयोग करण्यांत येत होता त्या कामाला ती कायमची नालायक झालेली असून, हितसंबंध असणारे मनुष्य ती घेण्यास सांगतील तर स्थानिक सरकारानें, ती एकाद्या सार्वजनिक कामाकरितां किंवा एकाद्या कंपनीकरितां कायमचीच पाहिजे असल्याप्रमाणें घेण्याविषयीं या आक्टाअन्वयें तजवीज केली पाहिजे.

३७. कलेक्टर व हितसंबंध असणारे मनुष्य यांचा, सदरहू मुदत संपल्यावेळीं सदरहू जमिनीची स्थिति कशी आहे याविषयीं किंवा सदरहू कबुलायतीशीं संबंध असणाऱ्या कोणत्याही बाबतीविषयीं मतभेद पडेल, तर कलेक्टरानें ती गोष्ट निकालाकरितां कोर्टास लिहून पाठविली पाहिजे. जमिनीच्या स्थितीविषयीं मतभेद.

## भाग ७.

### कंपन्यांसाठीं जमीन घेणें.

३८. (१) हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे या बाबतींत वेळोवेळीं कानू ठरवितील त्यांस अनुसरून स्थानिक सरकाराला, ज्या कोणत्याही कंपनीची आपल्या कामांकरितां जमीन घेण्याची इच्छा असेल त्या कंपनीच्या कोणत्याही अमलदारास, ४ थ्या कलमावरून दिलेले अधिकार चालविण्याचा अखत्यार देण्याचा अधिकार आहे. जमिनीवर जाऊन पाहणी करण्याचा कंपनीस अखत्यार देण्याचा अधिकार आहे.

(२) अशा दरेक प्रसंगीं, ४ थ्या कलमांत "सदरहू कामाकरितां" या शब्दांच्या-बदला "कंपनीच्या कामांकरितां" हे शब्द दाखल केले आहेत असें समजलें पाहिजे; आणि ९ व्या कलमांत "अमलदारानें" या शब्दापूर्वीं, "कंपनीच्या" हा शब्द दाखल केला आहे असें समजलें पाहिजे.

३९. कलमें ६ तागाईत ३७ या बत्तीस कलमांतील ठराव कोणत्याही कंपनीसाठीं जमीन घेण्याकरितां अमलांत आणणें असतील ते, स्थानिक सरकारचें अगोदर अनुमत घेतल्यावांचून, व पुढें सांगितलेला करारनामा अशा कंपनीनें करून दिल्यावांचून, आणतां कामा नये. स्थानिक सरकारचें अगोदर अनुमत घेणें व करारनामा करून देणें जरूर आहे.

४०. (१) सदरहूप्रमाणें अनुमत देणें तें,— पूर्व चौकशी.

(अ) सदरीलप्रमाणें घ्यावयाच्या जमिनीची कांहीं बांधकाम करण्याकरितां जरूरी आहे अशी, आणि

(ब) हें बांधकाम लोकांस उपयोगीं पडण्याचा संभव आहे अशी,

या कलमांत पुढें सांगितल्याप्रमाणें चौकशी होऊन स्थानिक सरकारची खातरी झाल्या-शिवाय देऊं नये.

(२) अशी चौकशी, स्थानिक सरकार नेमील तशा अमलदाराकडून आणि तशा वेळीं व जागीं झाली पाहिजे.

(३) अशा अमलदारास, दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा यांत दिवाणी कोर्टाच्या बाबतींत जे उपाय व जी रीति सांगितली आहे त्याच उपायांनीं व, शक्य असेल तेथवर, त्याच रीतीनें साक्षीदारांस समनें करण्याचा व त्यांस हजर होण्याचें भाग पाडण्याचा आणि दस्तऐवज हजर करण्याचें भाग पाडण्याचा अधिकार आहे.

सेक्रेटरी आफ् स्टेट इन् कौन्सिल यांच्याशीं करारनामा.

४१. सदरहू अमलदारानें सदरहू चौकशीच्या परिणामाबाबद स्थानिक सरकारास रिपोर्ट केला पाहिजे, आणि जी जमीन घेण्याचें योजिलें आहे ती कांहीं बांधकाम करण्यासाठीं पाहिजे असून, तें बांधकाम लोकांस उपयोगीं पडण्याचा संभव आहे अशी स्थानिक सरकारची खातरी होईल तर, हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे या बाबतींत वेळोवेळीं कानू ठरवितील त्यांस अनुसरून, त्या सरकारानें आपली खातरी होईल अशा रीतीनें हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी इन् कौन्सिल यांशीं पुढील गोष्टींबाबद करारनामा करावा असें सदरहू कंपनीस फर्माविलें पाहिजे. त्या गोष्टी येणेंप्रमाणें:—

(१) जमीन घेण्याचा खर्च सरकारास देणें;

(२) सदरील खर्च दिल्यावर जमीन कंपनीच्या नांवीं करून देणें;

(३) ज्या अटींनीं जमीन कंपनीनें धारण करावयाची त्या अटी;

(४) ज्या मुदतींत सदरहू बांधकाम पुरें करावयाचें व ज्या शर्तींनीं तें चालू ठेवावयाचें ती मुदत व त्या शर्ती; आणि

(५) ज्या अटींनीं लोकांस त्या कामाचा उपयोग करण्याचा हक्क मिळेल त्या अटी.

करारनामा प्रसिद्ध करणें.

४२. सदरहू प्रकारचा दरेक करारनामा, तो करून दिल्यानंतर साधेल तितक्या लवकर, इंडिया गझेटांत, व तसेंच स्थानिक सरकारी गझेटांत प्रसिद्ध केला पाहिजे, आणि मग तो (ज्या अटींनीं लोकांस सदरहू कामाचा उपयोग करण्याचा हक्क मिळावयाचा त्या अटींपुरता) या आक्टाचाच एक भाग असल्याप्रमाणें चालेल.

कलमें ३९ ते ४२ हीं, कंपन्यांस जमीन देण्याविषयीं ज्या बाबतींत सरकार करारनाम्यावरून बद्ध झालें असेल त्या बाबतींस लागू नाहींत.

४३. कलमें ३९ तागाईत ४२ या चार कलमांतील ठराव, ज्या कोणत्याही रेलवे किंवा इतर कंपनीच्या कारणांकरितां, अशा कंपनीच्या व इंडियाचे स्टेट सेक्रेटरी इन् कौन्सिल यांच्या दर्म्यान झालेल्या कोणत्याही करारनाम्याअन्वयें, जमीन देणें सरकारास भाग आहे अशा कोणत्याही कंपनीकरितां जमीन घेण्याच्या बाबतींत लागू होत नाहींत, आणि सन १८७० चा जमीन घेण्याविषयींचा आक्ट याचीं सदरहू कलमांशीं जुळतीं कलमें, सदरहू कोणत्याही कंपनीच्या कारणांकरितां, सदरीलप्रमाणें जमीन देणें सरकारास भाग होतें अशा कोणत्याही कंपनीकरितां जमीन घेण्याच्या बाबतींत कधींही लागू नव्हतीं असें समजावें.

रेलवे कंपनीच्या व स्टेट सेक्रेटरीच्या दर्म्यान करारनामा असल्याची कशी साबिती करावी.

४४. रेलवे कंपनीच्या कारणांकरितां जमीन घेण्याच्या बाबतींत, ४१ व्या कलमांत सांगितल्या प्रकारचा करारनामा असल्याची गोष्ट, सरकारच्या हुकुमावरून छापली आहे अशी दिसणारी त्याची एक छापील प्रत हजर करून शाबीत करण्याचा अधिकार आहे.

---

## भाग ८.

### किरकोळ.

नोटिशींची बजावणी.

४५. (१) या आक्टाअन्वयें कोणतीही नोटीस बजावणें ती, ती ४ थ्या कलमाअन्वयें असल्यास, त्या कलमांत सांगितलेल्या अमलदारानें सही केलेली, आणि ती दुसरी कोणतीही असल्यास, कलेक्टरानें किंवा जज्जानें किंवा त्याच्या हुकुमावरून सही केलेली तिची नकल देऊन किंवा देण्यास काढून बजाविली पाहिजे.

(२) साधेल तर अशी नोटीस, तींत नांव लिहिलेल्या मनुष्यावर बजाविली पाहिजे.

(३) सदरहू मनुष्य सांपडत नसेल तर, त्याच्या कुटुंबांतील जो कोणताही वयांत आलेला पुरुष त्याजपाशीं राहत असेल त्याजवर सदरहू नोटीस बजावण्याचा अधिकार आहे; आणि असा वयांत आलेला कोणताही पुरुष सांपडत नसला तर, तींत नांव लिहिलेला मनुष्य सामान्यतः ज्या घरांत राहत असेल किंवा धंदा चालवीत

असेल त्या घराच्या बाहेरील दारावर सदरहू नकल लावून, किंवा सदरील अमलदाराच्या किंवा कलेक्टराच्या कचेरींत किंवा कोर्टाच्या इमारतींत सहज दिसण्यांत येई अशा कोणत्या तरी जागीं, आणि घ्यावयाच्या जमिनीच्या तशाच कोणत्या तरी भागांत, तिची एक नकल लावून, ती बजावण्याचा अधिकार आहे:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं कलेक्टर किंवा जज्ज फर्मावील तर, कोणतीही नोटीस, तींत नांव लिहिलेल्या मनुष्यास, त्याचें अखेरचें राहण्याचें ठिकाण, पत्ता किंवा धंद्याची जागा माहीत असेल तेथें, हिंदुस्थानचा सन १८६६ चा पोस्ट आफिसाचा आक्ट याच्या ३ ऱ्या भागाअन्वयें रजिस्टर केलेल्या एका पत्रांत टपालांतून पाठविण्याचा, आणि ज्याच्या नांवें ती पाठविली त्याची पावती हजर करून ती बजाविल्याची शाबिती करण्याचा अधिकार आहे.

जमीन घेण्यास हरकत करण्याबद्दल शिक्षा.

४६. ४ थ्या किंवा ८ व्या कलमांत जें जें कृत्य करण्याचा अधिकार दिला आहे तसें कोणतेंही कृत्य करण्यामध्यें कोणत्याही मनुष्यास जो कोणी बुद्ध्या हरकत करील, किंवा ४ थ्या कलमाअन्वयें खणलेला कोणताही चर किंवा केलेली निशाणी बुद्ध्या बुजवील, नाहींशी करील, जायां करील किंवा काढून टाकील तो, माजिस्ट्रेटापुढें अपराधाची शाबिती झाली असतां, एक महिन्याहून जास्त नसणाऱ्या कोणत्याही मुदतीच्या कैदेच्या शिक्षेस, किंवा पन्नास रुपयांहून जास्त नाहीं अशा दंडास, किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

माजिस्ट्रेटानें जमीन स्वाधीन करण्याचें भाग पाडणें.

४७. जर कलेक्टरास या आक्टाअन्वयें कोणत्याही जमिनीचा कबजा घेण्यामध्यें प्रतिबंध किंवा अडथळा करण्यांत आला, तर तो माजिस्ट्रेट असल्यास, त्यानें ती जमीन सक्तीनें आपल्या स्वाधीन करून घेतली पाहिजे, आणि तो माजिस्ट्रेट नसल्यास, त्यानें माजिस्ट्रेटास किंवा (कलकत्ता, मद्रास व मुंबई या शहरांमध्यें) पोलीस कमिशनरास अर्जी केली पाहिजे, आणि प्रसंगाप्रमाणें अशा माजिस्ट्रेटानें किंवा कमिशनरानें ती जमीन सक्तीनें कलेक्टराच्या स्वाधीन करविली पाहिजे.

जमीन घेण्याचें काम पुरें करणें अवश्य नाहीं, परंतु तें पुरें केलें नसेल तेव्हां मोबदला दिला पाहिजे.

४८. (१) कलम ३६ यांत सांगितलेली बाबत खेरीज करून सरकारास, ज्या जमिनीचा कबजा घेतला नसेल तशी कोणतीही जमीन घेण्याचें काम सोडून देण्याची मोकळीक आहे.

(२) जेव्हां सरकार सदरीलप्रमाणें कोणतीही जमीन घेण्याचें काम सोडून देईल तेव्हां, नोटीस दिल्यामुळें किंवा तिच्याअन्वयें कोणतेंही काम चालविल्यामुळें अशा जमिनीच्या मालकाचें नुकसान झालें असेल त्याबद्दल द्यावयाच्या मोबदल्याची रकम कलेक्टरानें ठरविली पाहिजे, आणि त्यानें ती रकम हितसंबंध असणाऱ्या मनुष्यास, त्याला या आक्टाअन्वयें सदरहू जमिनीसंबंधीं काम चालविण्यामध्यें वाजवी रीतीनें झालेल्या सर्व खर्चांसुद्धां, दिली पाहिजे.

(३) या आक्टाच्या ३ ऱ्या भागांतील ठराव, लागू होण्यासारखे असतील तेथवर, या कलमाअन्वयें द्यावयाचा मोबदला ठरविण्याच्या बाबतींत लागू होतील असें समजावें.

घराचा किंवा इमारतीचा कांहीं भाग घेण्याबाबद.

४९. (१) कोणत्याही घराचा, कारखान्याचा किंवा इतर इमारतीचा फक्त कांहीं भाग घेणें असून, त्याचा किंवा तिचा मालक असें सगळें घर, कारखाना किंवा इमारत घ्या असें ह्मणेल, तर तो भाग घेण्याच्या कारणासाठीं या आक्टाचे ठराव अमलांत आणतां कामा नये:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, सदरहू मालकास, ११ व्या कलमाअन्वयें कलेक्टरानें निवाडा देण्यापूर्वीं कोणत्याही वेळीं, लेखी नोटीस देऊन, सदरहू सगळें घर, कारखाना किंवा इमारत घ्या असें जें त्याचें ह्मणणें तें परत घेण्याचा किंवा त्यांत कमजास्त करण्याचा अधिकार आहे:

असेंही आणखी ठरविण्यांत येतें कीं, या आक्टाअन्वयें जी कोणतीही जमीन घेण्याचें योजिलें असेल ती या कलमाच्या अर्थाप्रमाणें एकाद्या घराचा, कारखान्याचा किंवा इमारतीचा भाग आहे किंवा नाहीं याविषयीं कोणतीही तकरार उत्पन्न होईल, तर कलेक्टरानें ती गोष्ट निकालाकरितां कोर्टास लिहून पाठविली पाहिजे आणि अशा तकरारीचा निकाल होई तोंपर्यंत त्यानें सदरहू जमिनीचा कबजा घेतां कामा नये.

याप्रमाणें लिहून आलेल्या तकरारीचा निकाल करतांना कोर्टानें, जी जमीन घेण्याचें योजिलें असेल ती, सदरहू घराचा, कारखान्याचा किंवा इमारतीचा पूर्ण व अव्यंग उपयोग करण्याकरितां वाजवी रीतीनें जरूर आहे किंवा कसें या गोष्टीकडे लक्ष पुरविलें पाहिजे.

(२) घ्यावयाची जमीन, हितसंबंध असणाऱ्या मनुष्याच्या इतर जमिनीपासून वेगळी करण्यामुळें, त्यानें कलम २३, पोटकलम (१), बाबत ३, याअन्वयें केलेला कोणताही दावा गैरवाजवी किंवा फाजील आहे असें स्थानिक सरकारास वाटेल तर त्या सरकाराला, कलेक्टरानें निवाडा करण्यापूर्वीं कोणत्याही वेळीं, पहिल्यानें जेवढी जमीन घेण्याचा इरादा होता ती ज्या जमिनीचा भाग असेल ती सगळी जमीन घेण्याविषयीं हुकूम करण्याचा अधिकार आहे.

(३) वरील शेवटच्या पोटकलमांत सांगितलेल्या बाबतींत, कलमें ६ तागाईत १० या पांच कलमांअन्वयें कोणताही नवीन ठराव करण्याची किंवा इतर कोणतेंही काम चालविण्याची जरूरी नाहीं; परंतु कलेक्टरानें स्थानिक सरकारच्या सदरहू हुकुमाची नकल विलंब न लावितां हितसंबंध असणाऱ्या मनुष्यास दिली पाहिजे, आणि त्यानंतर त्यानें ११ व्या कलमाअन्वयें निवाडा करण्याच्या कामीं लागलें पाहिजे.

स्थानिक अधिकाऱ्याच्या किंवा कंपनीच्या खर्चानें जमीन घेणें.

९०. (१) स्थानिक अधिकाऱ्याच्या निर्बंधाखालील किंवा व्यवस्थेखालील कोणत्याही फंडाच्या खर्चानें किंवा कोणत्याही कंपनीच्या खर्चानें जमीन घेण्याच्या कारणासाठीं या आक्टांतील ठराव अमलांत आणण्यांत येतील तेव्हां, याप्रमाणें जमीन घेण्याचा किंवा घेण्यासंबंधीं येणारा खर्च अशा फंडांतून किंवा कंपनीनें भागविला पाहिजे.

(२) अशा बाबतींमध्यें कलेक्टरापुढें किंवा कोर्टापुढें चालविलेल्या कोणत्याही कामांत विवक्षित स्थानिक अधिकाऱ्यास किंवा कंपनीस हजर होण्याचा व मोबदल्याची रकम ठरविण्याच्या कारणाकरितां पुरावा सादर करण्याचा अधिकार आहे:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, अशा कोणत्याही स्थानिक अधिकाऱ्यास किंवा कंपनीस, १८ व्या कलमांअन्वयें लिहून पाठविण्याविषयीं अर्जी करण्याचा हक्क नाहीं असें समजावें.

स्टांपड्यूटीची व फीची माफी.

९१. या आक्टाअन्वयें केलेल्या कोणत्याही निवाड्यास किंवा करारनाम्यास स्टांपड्यूटी पडणार नाहीं, आणि अशा कोणत्याही निवाड्याअन्वयें किंवा करारनाम्याअन्वयें दावा सांगणारा कोणताही मनुष्य त्याची नकल मिळण्याबद्दल कोणतीही फी देण्यास पात्र होणार नाहीं असें समजावें.

या आक्टास अनुसरून केलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल दावा करणें असेल तेव्हां नोटीस देणें.

९२. या आक्टास अनुसरून केलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही मनुष्याविरुद्ध कोणताही दावा किंवा इतर काम चालविण्याचा इरादा असल्यास, त्याची व त्याच्या कारणाची अगोदर एक महिन्याची लेखी नोटीस दिल्यावांचून, व तसेंच नुकसानीचा पुरता मोबदला देण्यास काढल्यानंतर, तो दावा किंवा तें काम सुरू करतां किंवा चालवितां कामा नये.

दिवाणी काम चालविण्याच्या रीतींविषयींचा कायदा कोर्टापुढें चालणाऱ्या कामास लागू आहे.

९३. दिवाणी काम चालविण्याच्या रीतींविषयींचा कायदा यांतील ठराव, ते या आक्टांतील कोणत्याही गोष्टीशीं विरुद्ध नसतील तेथवर, या आक्टाअन्वयें कोर्टापुढें चालणाऱ्या सर्व कामांस लागू होतील असें समजावें.

९४. या आक्टाअन्वयें चालविलेल्या कोणत्याही कामांत कोर्टानें दिलेल्या कोणत्याही निवाड्यावर किंवा अशा निवाड्याच्या कोणत्याही भागावर, दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींच्या कायद्याचे जे ठराव अवल हुकुमनाम्यांवर होणाऱ्या अपिलांस लागू आहेत त्यांस अनुसरून, हाय कोर्टांत अपील चालेल. कोर्टापुढें चाललेल्या कामांवर अपिलें.

९५. (१) स्थानिक सरकारास, हा आक्ट अमलांत आणण्याविषयींच्या सर्व बाबतींत काम चालविण्याच्या संबंधानें अमलदारांची समजूत होण्यासाठीं या आक्टास अनुसरून कानू करण्याचा अधिकार आहे, आणि तसेंच, याप्रमाणें केलेल्या कानूंत वेळोवेळीं फेरफार करण्याचा व जास्त मजकूर दाखल करण्याचाही त्या सरकारास अधिकार आहे. कानू करण्याचा अधिकार.

(२) पोटकलम (१) याअन्वयें कानू करण्याचा आणि त्यांमध्यें फेरफार करण्याचा व जास्त मजकूर दाखल करण्याचा अधिकार दिला आहे तो, अशा कानू करण्यापूर्वीं किंवा त्यांमध्यें फेरफार करण्यापूर्वीं किंवा जास्त मजकूर दाखल करण्यापूर्वीं त्या प्रसिद्ध केल्या पाहिजेत, अशा अटीनें दिला आहे असें समजावें.

(३) अशा सर्व कानू, फेरफार व जास्त मजकूर यांस गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची मंजुरी मिळाल्यावर त्या सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध केल्या पाहिजेत, व त्यानंतर त्या कायद्याप्रमाणें चालतील.

एस्. हार्व्हे. जेम्स,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True Translation.)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.